MHRT080000832021

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १३/२०२१</u>**

**<u>मधील निशाणी ७८ खालील आदेश</u>**

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १५ विरुध्द मुदतीत वारस रेकॉर्डवर न घेण्यात आल्याने वारस रेकॉर्डवर घेवुन मुळ दाव्यात प्र.वादी क्र.१५ यांच्या नावापुढे ''मयत'' असे लिहीण्यास परवानगी मिळावी व त्याकरीता दावा दुरुस्ती करणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ अन्वये केलेला आहे.

२. वादी प्रस्तुत अर्जात असे नमुद करतात की, प्रतिवादी क्र. १५ झिलु दाजी गुरव हे दिनांक २९/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी मयत झाल्यानंतर वादींना कळले आहे. प्रतिवादी क्र.१५ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी वादी हे आजारी असल्यामुळे व त्यांना हिंडणे फिरणे शक्य नसल्यामुळे ४१२ दिवसांचा विलंब झाला आहे. सबब न्यायाचे दृष्टीने वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत अशी विनंती वादीनी नि. ७४ आणि नि. ७६ खाली केलेली आहे. तरी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी नं. १५ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो व प्रतिवादी नं. १५ चे वारस रेकॉर्डवर न आणल्याने त्यांचे विरुध्द तांत्रिकदृष्टया झालेला अबेटमेंटचा आदेश सेट—असाईट करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे देवून या अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, वारस मुदतीत रकॉर्डवर

न आणल्याने दावा अबेट झाला. त्यामुळे दावा दुरुस्ती करावी लागली व परिणामत: मूळ दाव्यात बदल करावे लागले सबब वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. प्रस्तुत दाव्यातील संपूर्ण अभिलेख, प्रस्तुतचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नि. ७४, नि.७६ खाली पारीत झालेल्या आदेशानुसार दाव्यातील प्रतिवादी क्र. १५ यांच्या नावासमोर ''मयत'' लिहिणे अत्यावश्यक आहे. सदरची दावा दुरुस्ती ही अत्यंत सर्वसाधारण असल्यामुळे व त्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत नसल्यामुळे दाव्याच्या प्रामाणिक व अंतिम न्यायनिवाडयाकरीता सदरचा अर्ज मंजूर करणे यथोचित ठरेल. सबब अर्ज मंजूर करण्यात येतो खालील आदेश पारीत करण्यात येतो.

—: **आदेश** :—

१. अर्ज निशाणी ७८ मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरच्या दाव्यात वर नमुद दावा दुरुस्ती करावी. तसेच दिवाणी प्रकिया संहिता ऑर्डर ६ रुल १८ नुसार वादीने १४ दिवसात अथवा पुढील तारखेस दावा दुरुस्ती न केल्यास व दुरुस्ती प्रत दाखल न केल्यास सदरील आदेश आपोआपच रद्द होईल.

३. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाही.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2022.11.15 14:24:18 +0530

**दिनांक : ११/११/२०२२** **सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर,**

**देवरुख.**

: **C E R T I F I C A T E** :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 13/2021 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 11/11/2022 |
| Order signed by Presiding Officer on | : | 11/11/2022 |
| Order uploaded on | : | 12/11/2022 |